**नि.फौ.के. नं. ७४/२०१७**
**महाराष्ट्र शासन वि. राजेंद्र**
**निशाण क्र. ५० लगत**

**<u>उलटतपास शपथेवर, आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांचेकडून</u> –**

**०४.** माझा व्यवसाय शेती आहे. आरोपी हे माझ्या मोठया भावाचे साडु आहेत. त्यांची व माझी ओळख नुकतीच झाली होती. आरोपी हे कोठेही कामाला नव्हते. माझा शेती व्यतीरीक्त इतर कोणताही व्यवसाय नाही. माझ्या म्हणण्यानुसार, आरोपीला दिलेली रक्कम रुपये ०५ लाख माझ्याकडे कशी आली, याचे विवरण मी फिर्यादमध्ये दिले नाही, अगर तपासकामात पोलीसांना सांगितले नाही. प्रकाश गोविंद कांबळे यांच्याकडुन मी रक्कम रुपये ५०,०००/– घेतलेबाबतचा पुरावा तपासीक अधिकारी यांना दिला होता.

**०५.** ***प्रश्नः*** *सदरची बाब दाखविण्याकरीता तुम्ही तपासीक अधिकारी यांना कोणता पुरावा दिला होता?*

*(सदरचा प्रश्न साक्षीदारास वारंवार विचारण्यात आला. परंतु, साक्षीदाराने लेखी दिला होता, इतकेच उत्तर दिले).*

**०६.** सदरचा लेखी पुरावा म्हणजे नोटरी कागद दिलेला आहे.

**०७.** ***प्रश्नः*** *तसा कोणताही कागद प्रस्तुत खटल्यामध्ये दाखल नाही, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?*

***उत्तरः*** *माझी तब्येत बरोबर नसते, त्यामुळे मला सांगता येत नाही.*

**०८.** **प्रश्नः** प्रकाश गोविंद कांबळे, राहणार – राजापुर, जि. रत्नागिरी, यांना जबाब नोंदविण्यासाठी पोलीस ठाण्यात तुम्ही नेले होते का?

**उत्तरः** त्यांना बोलाविण्यात आले नसल्याने त्यांचा जबाब नोंदविला नाही.

**०९.** माझ्या म्हणण्यानुसार, श्रीधर सिताराम जाधव यांचेकडुन रक्कम रुपये ५०,०००/– घेतलेबाबतचा पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नाही. प्रकाश कांबळे व श्रीधर सिताराम जाधव यांचा जबाब नोंदविले नसलेबाबत मी तपासीक

अधिकारी यांच्याकडे विचारणा केली नाही किंवा त्यांच्या वरीष्ठांकडे त्याबाबत तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र गणपत कांबळे यांचेकडुन रक्कम रुपये ५०,०००/– घेतलेबाबतचा पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नाही. माझ्या म्हणण्यानुसार, उर्वरीत रक्कम रुपये ३,५०,०००/– इतकी रक्कम मी माझे दागिने रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये गहाण ठेवुन जमा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र गंगाराम मोहिते यांना पैसे देण्यासाठी मी दागिने सदर बँकेमध्ये गहाण ठेवलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्यानुसार, सदर व्यक्तिंकडुन रक्कम घेतल्याच्या तारखा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर तारखा फिर्यादीमध्ये नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

**१०**. माझ्या म्हणण्यानुसार, तथाकथीत करारपत्राचा मुळ दस्त न्यायालयात दाखल आहे.

**११**. ***प्रश्नः*** *तथाकथीत करारपत्राचा मुळ दस्त न्यायालयात अभिलेखावर दाखल नाही, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे?*

*(सदरचा प्रश्न साक्षीदारास वारंवार विचारण्यात आला. परंतु, साक्षीदाराने उत्तर दिले नाही. थोडया कालावधीनंतर पुढील प्रमाणे उत्तर दिले आहे).*

***उत्तरः*** *मी मुळ दस्त पोलीसांकडे दिला होता, त्यांनी मला True copy करुन मला दिली.*

**आरोपीतर्फे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन सदर साक्षीदाराचा उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.01.30 18:38:18 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ३०/०१/२०२६ — न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख — जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 30/01/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 30/01/2026 |
| Evidence uploaded on | :- | 30/01/2026 |